Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2021

ISSUE No- (CCLXXVI ) 276 - A

## Women's Rights : Status & Goal



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor:**
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

**Editor:**
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci,
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## March -2021

ISSUE No- (CCLXXVI) 276 (A)

# Women's Rights : Status & Goal



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

**Editor**
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci,
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) A | March, 2021

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | मानवाधिकार आणि तुरुंगातील महिला संरक्षण | डॉ. रतन व्ही. राठोड | 1 |
| 2 | मानवी हक्कांच्या संदर्भात महिला सुरक्षितता | डॉ. संदीप बी. काळे | 4 |
| 3 | भारतीय संविधान आणि महिला अधिकार | प्रा. पी. आर पाचपुते | 8 |
| 4 | समाजातील स्त्रीयांचे स्थान/दर्जा व भुमिका | प्रा.डॉ.प्रमिला डी.मोयर | 12 |
| 5 | पंचायत राज आणि महिलांचे नेतृत्व | प्रितम लहानू मोरे | 17 |
| 6 | महिला सबलीकरणाच्या योजना व कार्यक्रम | प्रा. डॉ. एस. एन. देशमुख | 22 |
| 7 | स्वतंत्र भारतातील महिलांचे हक्क | प्रा. विनोद म. पुनवटकर | 26 |
| 8 | महिलांचा विकास आणि मानवाधिकार | प्रा.डॉ. राजू अंबाडकर | 29 |
| 9 | ग्रामीण महिला विकास आणि शासकीय योजनांची फलश्रुती | प्रा.डॉ.राखी श्रीराम तुरसकर | 32 |
| 10 | स्त्री—मुक्ती चळवळीत डॉ. बाबासाहेबआंबेडकरांचे योगदान | प्रा. भारती दिगांबर रत्नपारखी /प्रा. जगदीश रामदास चिमूरकर | 36 |
| 11 | महिलांचे आर्थिक सबलीकरण | प्रा.डॉ. निलम एम. छंगाणी | 41 |
| 12 | भारतीय स्त्रियांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन | डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे | 45 |
| 13 | भारतीय महिलांचा राजकीय सहभाग | डॉ. सचिन महादेव पाटील | 50 |
| 14 | भारतातील महिलांची साक्षरता आणि महिलांचे सबलीकरण | प्रा.संजय सी. गिऱ्हेपुंजे | 59 |
| 15 | ग्रामीण महिला उद्योजक आणि सक्षमीकरण | प्रा. डॉ. संजय मारोतीराव मुंडकर | 65 |
| 16 | महिलांचा राजकारणतील सहभाग : आंतरराष्ट्रीय अध्ययन | प्रा. डॉ. संकेत सुरेश काळे | 69 |
| 17 | सावित्रीबाई फुले यांचे स्त्रीमुक्तिसाठी शैक्षणिक योगदान | प्रा.डॉ.शहनाज शेख | 73 |
| 18 | मानवी हक्क आणि महिला | प्रा.शहाणे रंजना प्रल्हादराव | 76 |
| 19 | मानवी हक्क आणि महिला विकासाच्या संधित अनेक कायदे | प्रा. डॉ. उमेशकुमार पी. शहारे | 79 |
| 20 | स्त्री सुंता : कारणे, परिणाम व उपाय | डॉ. शेख फारुक नजीर / प्रा. रुपसी दास | 83 |
| 21 | महिला: उद्योजकतेकडून सक्षमीकरणाकडे | मोरेश्वर भिकाजी शेन्डे | 89 |


Dr. M. K. Umathe College, Nagpur

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | स्त्री आणि पर्यावरण — एक तात्विक बाजू | स्मिता बीतुले | 94 |
| 23 | महिलांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान. | प्रा.प्रफुल ई. बोके | 98 |
| 24 | शिक्षण व महिलांचे कायदेविषयक ज्ञान | डॉ.दयाराम दुधाराम पवार | 101 |
| 25 | महिलांचे अधिकार :स्वरूप आणि वास्तव | निता दयू घडलिंग | 105 |
| 26 | पंचायतराज मध्ये महीलांचे सक्षमीकरण आणि स्वावलंबन | प्रा.डॉ.शुद्धोधन एस. गायकवाड | 109 |
| 27 | भारतातील स्त्रीवादी चळवळ | प्रा.संजय अंकुशराव जगताप | 114 |
| 28 | राजकारणात महिलांच्या समानतेचा संघर्ष | डॉ. अरविंद सोमनाथे | 117 |
| 29 | भारतीय सर्वोच्च मार्गदर्शिका निर्माण कार्यात स्त्रियांचे योगदान | प्रा. डॉ. सुनिता शं. कुरूडे | 121 |
| 30 | अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि स्त्रियांचीस्थिती | सुवर्णा ज्ञानेश्वर सोनुने | 126 |
| 31 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार | प्रा. सिध्दार्थ बी. टेंभूर्णे | 129 |
| 32 | भारतीय राज्यघटना आणि महिला अधिकार | शेख उजमा खलील | 133 |
| 33 | राजकीय पक्षात महिलांची भूमिका | उज़्मा ऐनोद्दीन सिद्दीकी | 136 |
| 34 | महिलांचे मानवाधिकार | डॉ. वकील टी. शेख | 140 |
| 35 | महिला सक्षमीकरण — एक अवलोकन | डॉ. हिराचंद चोखाजी वेस्कडे | 145 |
| 36 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार व कायदे | डॉ. विजया एच. राऊत | 149 |
| 37 | स्त्री सक्षमी करण्याकरीता शासनाच्या योजना | प्रा. विलास मेश्राम | 156 |
| 38 | स्त्री—भ्रूणहत्या: एक सामाजिक प्रश्न | डॉ. विनोद बी. खेडकर | 160 |
| 39 | पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा सहभाग | प्रा. मनोहर शामराव वागतकर | 165 |



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

# स्त्री—भ्रूणहत्या: एक सामाजिक प्रश्न

डॉ. विनोद बी. खेडकर
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,

➢ सारांश (Abstract):–

भारताने 1991 ला जागतिकीकरण स्वीकारून समान कामाची संधी प्राप्त करून दिली. याचाच परिणाम म्हणून देशामध्ये महिलांना अनेक संधी प्राप्त झाल्या. आज भारतामध्ये महिला राजकारण, समाजकारण, मल्टीनॅशनल कंपन्यांचा कारभार, क्रीडा, संशोधन, बँक, उद्योजक, आर्मी, नेव्ही इत्यादी ठिकाणी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. असे असले तरी भारतामध्ये प्राचीन काळापासून महिलांनी स्वतःला सिद्ध करताना संघर्ष केला व आजही आधुनिक तंत्रज्ञानाने स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे. त्याचाच एक प्रकार म्हणजे स्त्रीभ्रूणहत्या होय. भारतामध्ये पुरुषसत्ताक मानसिकतेने 'वंशाचा दिवा' म्हणजे मुलाला अधिक महत्त्व दिले आहे. मुलगी म्हणजे शाप होय, कुटुंबावरील ओझे आहे. म्हणून तिला जन्मापूर्वीच मारले जाते. कळी खुल्या आधीच खुडल्या जात आहेत. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'स्त्रीभ्रूणहत्या: एक सामाजिक प्रश्न' या दृष्टिकोनातून भ्रूणहत्या, त्याची कारणे, लिंगगुणोत्तर प्रमाण, सोनोग्राफीचा उपयोग, गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा याचा आढावा घेतला आहे. तसेच प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन पद्धतीतील दुय्यम स्रोतांचा उपयोग केला असून त्यामध्ये जनगणना, अहवाल, संदर्भग्रंथ, संशोधन अहवाल, इंटरनेट, वर्तमानपत्रे आणि अवलोकन तंत्रांचा उपयोग केला आहे. तसेच प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग देखील केला आहे.

➢ की–वर्ड(Kye words):–स्त्रीभ्रूणहत्या, लिंगगुणोत्तर, कायदा आणि सामाजिक प्रश्न.

➢ प्रस्तावना:–

प्राचीन काळापासून स्त्री समाजाच्या अवहेलना आणि अन्याय अत्याचाराचा विषय राहिलेला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान दिले आहे. तिला आजतागायत समान अधिकार म्हणजेच समतेची, बंधूत्वाची, न्यायाची, स्वातंत्र्याची, मानवतेची वागणूक मिळताना दिसत नाही. आज स्त्रियांना घटनेने अधिकार मिळवून दिले असले तरीही भारतीय चालीरीती, लोकनीती, लोकरीती, प्रथा–परंपरा, चुकीच्या श्रद्धा, समजुती ह्या अधिकाराच्या वापरास व्यत्यय ठरताना दिसत आहेत. 21 व्या शतकातील सुखलोलपु जगात स्त्रीया पूर्णतः सुखी झाल्या असे म्हणता येणार नाही. ज्याकाही स्त्रिया सुखी जीवन जगत आहेत, त्या पूर्णतः सुखी आहेत असे नाही किंवा त्या वरवर सुखी असल्याचे दर्शवितात, परंतु त्या आतून मनाने पूर्ण खचलेल्या अवस्थेत जीवन जगताना दिसत आहेत.

आज मुली प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. चाकोरीच्या बाहेर जाऊन आपले क्षितीज धुंडाळणारी स्त्री आज खऱ्या अर्थाने सक्षम आहे, परंतु तिला अनेक प्रश्नांना, अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे, कारण कुटुंबात होणारा तिचा छळ, बलात्कार, शारीरिक, मानसिक व लैंगिक अत्याचाराच्या घटना, कामाच्या ठिकाणी होणारे शोषण ही चिंताची बाब बनली आहे. एकीकडे फुले–शाहू–आंबेडकर, छत्रपती शिवाजी, जिजाऊ यांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात स्त्रिया विषयीच्या अत्याचारांमध्ये दिवसागणिक वाढ होताना दिसत आहे. त्यातच स्त्रीभ्रूणहत्येचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. वंशाला दिवा हवा, आपण मेल्यानंतर आपल्या चितेला अग्नी देण्यासाठी कुलदीपक हवा या हव्यासापोटी किंवा स्त्री हे परक्याचे धन, तिला हुंडा द्यावा लागणे तसेच अनेक अनिष्ट चालीरीतीनमुळे भ्रृणहत्तेचे प्रमाण वाढत आहे. प्रगतीकडे वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्रामध्ये मुलींचे प्रमाण दिवसेंदिवस वेगाने कमी होत आहे. 1991 मध्ये दरहजारी

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

मुलांमागे मुलींचे प्रमाण 446 इतके होते, ते 2001 मध्ये ते 33 ने कमी होऊन 913 इतके झाले आणि 2011 च्या जनगणनेनंतर आणखी 30 ने कमी होऊन 883 इतके झाले. ही अतिशय चिंतेची व विचार करण्यासारखी बाब आहे. मुलींना जन्माला येण्या अगोदरच (कळी उमलन्या अगोदर) गर्भातच निर्दयीपणे मारले गेले. मागच्या 2001–10 या दशकात बारा लाख प्रकरणे समोर आली. द हिंदू समाचार पत्रानुसार आजतागायत तीन मिलियन भ्रूणहत्या झाल्या आहेत. एका सर्वेक्षणानुसार भारतात एकूण लोकसंख्येच्या 5. 9 टक्के लोकसंख्येचा जन्मच होऊ दिला जात नाही. स्त्रीभ्रूणहत्येच्या प्रकरणात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो, त्यातही बीड, जळगाव, अहमदनगर, बुलढाणा, कोल्हापूर, सांगली, जालना, सोलापूर, औरंगाबाद इत्यादी जिल्ह्यांमध्ये लिंगगुणोत्तर प्रमाण अतिशय कमी आहे. महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात हे प्रमाण सर्वाधिक कमी म्हणजे 807 इतके असून, शिरूर कासार हा देशातील कमी म्हणजे 779 इतके लिंग गुणोत्तर असणारा तालुका ठरला आहे.

➢ संशोधनाची उद्दिष्टे:–

1. भारतातील लिंग गुणोत्तर तपासणे.
2. स्त्रीभ्रूणहत्येसाठी वापरण्यात येणाऱ्या संकेतांचा शोध घेणे.
3. स्त्रीभ्रूणहत्येच्या प्रमुख कारणांचा अभ्यास करणे.

➢ संशोधनाची तंत्रे :–

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सामाजिक संशोधनातील दुय्यम स्रोतांचा उपयोग केला असून त्यामध्ये जनगणना अहवाल, संदर्भग्रंथ, संशोधन अहवाल, इंटरनेट, वर्तमानपत्रे आणि सर्वेक्षण तंत्राचा उपयोग केला आहे.


➢ संशोधनाचा आराखडा :–

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला आहे.

➢ भारतातील लिंग गुणोत्तर प्रमाण :–

| वर्ष | भारतातील लिंगगुणोत्तर प्रमाण | |
|---|---|---|
| | संख्या | साधारण वृद्धी |
| 1901 | 972 | |
| 1911 | 964 | –8 |
| 1921 | 955 | –9 |
| 1931 | 950 | –5 |
| 1941 | 945 | –5 |
| 1951 | 946 | +1 |
| 1961 | 941 | –5 |
| 1971 | 930 | –11 |
| 1981 | 934 | +4 |
| 1991 | 929 | –5 |
| 2001 | 933 | +5 |
| 2011 | 940 | +7 |

(Census of India 2011, Government of India, New Delhi, April 2011.)



स्रोत – विभिन्न वर्षों की भारतीय जनगणना रिपोर्ट

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

लिंगगुणोत्तर प्रमाण दर १००० पुरुषांमागे असलेली स्त्रियांची संख्या अशा पद्धतीने मोजली जाते. लिंगगुणोत्तर हे लोकसंख्येमधील पुरुष व स्त्रियांचे गुणोत्तर आहे. जगात सर्वसाधारणपणे पुरुष व स्त्रियांचे प्रमाण 1:1 असे अपेक्षित असले तरीही प्रत्येक देशात हे गुणोत्तर वेगळे आढळते. भारतामध्ये स्त्रियांची घटणारी लोकसंख्या चिंतेची बाब असून 2011 च्या जनगणना अहवालानुसार भारतात 1000 पुरुषांच्या

मागे 940 स्त्रिया आहेत. 1901 ते 2011 चा जनगणना अहवाल पाहिल्यास लिंगगुणोत्तर प्रमाण हे सातत्याने कमी झालेले आहे, जरी 1981, 2001 व 2011 मध्ये प्रमाण वाढले असले, तरी त्याचे प्रमाण अनुक्रमे +4, +5 व +7 इतके आहे. म्हणजेच भारतातील लिंगगुणोत्तराच्या प्रमाणात सातत्याने घट झाली आहे. 0–6 या वयोगटांमध्ये लिंगगुणोत्तराचा शोध घेतला असता असे दिसते की, 1961 मध्ये 976 वरून 2011 मध्ये हे प्रमाण 914 वर आले आहे. हा आलेख पाहिला असता यामध्ये सातत्याने घट झालेली दिसते.

भारतातील विविध राज्यांचा अभ्यास केला असता असे दिसते की, 2011च्या सेन्सस रिपोर्टनुसार 0–6 या वयोगटातील लिंगगुणोत्तर प्रमाण बिहार 933 गुजरात 886, हरियाणा 834, महाराष्ट्र 883, पंजाब 846, राजस्थान 883, जम्मू आणि कश्मीर 863 आणि दिल्ली 871 या प्रगत समजल्या जाणाऱ्या राज्यात लिंगगुणोत्तर प्रमाण अत्यंत कमी आहे. 1991 नंतर सामान्य लिंगगुणोत्तरात वाढ होत असली तरी 0–6 वयोगटातील लिंगगुणोत्तरामध्ये सातत्याने घट होत आहे. महाराष्ट्रामध्ये हेच प्रमाण बीड 807, जळगाव 842, अहमदनगर 852, बुलढाणा 855, औरंगाबाद 858, कोल्हापूर 845 आणि सांगली 867 इतके आहे. यातील कोल्हापूर, अहमदनगर, सांगली हे जिल्हे प्रगत समजले जातात. या प्रगत जिल्ह्यांमध्ये स्त्रीभ्रूणहत्याचे प्रमाण अधिक आहे.

गेल्या दहा वर्षांमध्ये भारतामध्ये लींगगुंनोत्तर वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न होताना दिसत आहेत. जसे डिगरी बचाओआंदोलन, जागर जाणिवांचा, लेक वाचवा, माझी कन्या भाग्यश्री इत्यादी आंदोलने चालवली गेली परंतु असे असतानाही स्त्रीभ्रूणहत्या थांबलेल्या नाहीत हे प्रमाण वरचेवर वाढतच असताना दिसत आहे.

➢ स्त्रीभ्रूणहत्येसाठी वापरण्यात येणारी सांकेतिके:–

मुलगा होणार की मुलगी हे जाणून घ्यायचे असेल तर सोनोग्राफी सेंटर व काही मोजक्या डॉक्टरांनी गर्भलिंग निदानाचा धंदा जोरात सुरू केला होता. त्यासाठी 70 हजाराहून ते एक लाखांपर्यंत रेट डॉक्टरांनी ठेवला होता. ठाणे, बीड, परळी, जळगाव, कोल्हापूर, बिदर हे तर याचे केंद्र बनले होते.

ठाणे येथे 2011 मध्ये एका सोनोग्राफी सेंटरवर धाड टाकली असता समोर आलेली माहिती अत्यंत धक्कादायक होती. कायद्याने गर्भलिंग निदान जाहीर करणे बंदी असल्याने सोनोग्राफी झाल्यावर गर्भ मुलीचा असेल तर तुम्ही 'फ्रायडे'ला व गर्भ मुलाचा असेल तर तुम्ही 'मंडे'ला या अशा संकेताचा उपयोग केला जायचा. अर्थात यातील 'एफ' म्हणजे 'फिमेल' व 'एम' म्हणजे 'मेल' होय. येथे राजस्थान, गुजरात व हरियाणा या राज्यातून पेशंट येत असत. तसेच कोल्हापूर येथील एका सोनोग्राफी सेंटरवर छापा टाकला असता, येथे देखील महत्त्वाची माहिती समोर आली अर्थात गर्भ मुलीचा असेल तर 'कोल्हापुरी मिरची' आणि गर्भ मुलाचा असेल तर 'ढोबळी मिरची' (शिमला मिरची) अशा संकेतांचा वापर होत असे. येथे आंध्रप्रदेश, राजस्थान, बिहार, दिल्ली, कर्नाटक येथून पेशंट येत असत. अशाच बीड जिल्ह्यातील एका दवाखान्यामध्ये मुलगा की मुलगी हे ठरवण्यासाठी संकेताचा वापर होत असे. मुलगा असेल तर +(प्लस) आणि गर्भ मुलीचा असेल तर – (मायनस) या संकेतांचा उपयोग होत असे.

➢ स्त्रीभ्रूणहत्येची कारणे:–

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये स्त्रीभ्रूणहत्येच्या प्रमुख कारणांचा शोध घेतला असता काही कारणे समोर आली आहेत.

भारतामध्ये मुलगा होणे किंवा मुलगी होणे हे स्त्रीच्या हातात नाही. ही एक प्रक्रिया आहे, परंतु तरी देखील मुलगा होण्यासाठीची सक्ती स्त्रीवर केली जाते. अशीच उस्मानाबाद येथील एका महिलेला गर्भजल लिंग परीक्षणाची सक्ती केली गेली. त्या महिलेने विरोध दर्शवला असता. त्या महिलेस आठ दिवस एका खोलीमध्ये कोंडून ठेवले. आपल्या नातेवाइकांच्या मदतीने तीने स्वतःची सुटका करून घेतली. अशीच घटना सोलापूर मध्ये देखील घडली येथे एका मुलीला तिसरी मुलगी झाली म्हणून तिला मारून

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

स्वतःच्याच घरांमध्ये पुरून ठेवले, कारण त्यांना मुलगा हवा होता. अशा प्रकारे गुलाची सक्ती ही फक्त स्त्रीवरच केली जाते.

भारतामध्ये मुलाला खूप महत्त्व दिले जाते. तो वंशाचा दिवा आहे, मोक्षप्राप्तीसाठी मुलगाच हवा, आपला वंश चालवण्यासाठी मुलगाच हवा आहे. अशा अनिष्ट रूढी आहेत. यासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी कुटुंबातील व्यक्तींची असते. लातूर मध्ये एका महिलेला चार मुली झाल्या. पुन्हा मुलगी नको म्हणून तिची टेस्ट करून घेतली परंतु तिला पुन्हा मुलगीच झाली. त्याच दिवशी तिला घरातून बाहेर काढले ती आज आपल्या मुलींसोबत मुंबईमध्ये कचरा गोळा करते आहे. अशाच अनिष्ट प्रथांमुळे स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण वाढत आहे.

गर्भलिंग निदान कायद्याचा दुरुपयोग व तंत्रज्ञानाचा दुरुपयोग हे सुद्धा भ्रूणहत्येस कारणीभूत ठरत आहे. महाराष्ट्रामध्ये प्रसवपूर्व व प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान कायदा लागू केला असला, तरी स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण थांबलेले नाही. कारण सोनोग्राफी या तंत्रज्ञानाचा उपयोग यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये केला जातो. खरेतर सोनोग्राफीचा उपयोग काही व्यंग तपासण्यासाठी, बाळाची तब्येत तपासण्यासाठी व त्याची योग्य वाढ तपासण्यासाठी केला जातो, परंतु काही डॉक्टर्स सर्रासपणे याचा उपयोग लिंग तपासण्यासाठी करत आहेत. तसेच नवनवीन तंत्रज्ञान देखील यास जबाबदार आहे. मध्यंतरी एका स्थानिक वृत्तपत्रांमध्ये मुलगा हवा का? अशी जाहिरात होती. त्यावर मोबाईल नंबर ही दिला होता. 'डेकाय' ने रुग्ण असल्याचे भासवून चौकशी केली असता येथील डॉक्टरांनी 300 बायकांना मुलगा दिल्याचे सांगितले. एवढेच नव्हे तर एका प्रख्यात मोबाईल कंपनीने मुलगा व्हावा म्हणून बाईने काय खावं हे आपल्या साइटवर 'चायनीज कॅलेंडर' तयार करून दिलं होतं. (लोकसत्ता, चतुरंग, दि. 10 डिसेंबर 2011.)

मुलगी म्हणजे डोक्याला ताप ही मानसिकता अद्याप संपलेली नाही. हुंड्यासाठी होणारा छळ, ठराविक काळात मुलीची घ्यावी लागणारी काळजी या आगामी काळात होणाऱ्या त्रासाला घाबरण याबरोबरच आणखी काही कारणांमुळे लोक मुलीला जन्माला घालण्याचे टाळत आहेत. मुलगी हे परक्याचे धन आहे, तिच्या वाढवण्यावर, शिक्षणावर होणारा खर्च वायफट जाणार आहे. ही मानसिकता तयार झाली आहे. तसेच वाढता घटस्फोट, मानसिक, शारीरिक त्रास या वैतागला कंटाळून आत्महत्याला कवटाळत आहेत. यामुळे व आणखी बऱ्याच समस्या निर्माण होतात म्हणून लोक असा विचार करत आहे की मुलगी नकोच.

अशा अनेक घटना आपणास दिसतात, ज्यामुळे स्त्रीभ्रूणहत्याचे प्रमाण वाढले आहे. कायदा सक्षम आहे, परंतु त्यामध्ये अनेक पळवाटा काढल्या जातात. तसेच त्याची योग्य अंमलबजावणी होताना दिसत नाही. म्हणून भ्रूणहत्या सारख्या समस्या वरचेवर वाढताना आपल्याला दिसत आहेत.

➢ समारोपः–

भारतामध्ये स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. सेक्स रेशो बर्थ अहवाल 2017 च्या नुसार भारतामधील गुजरात, राजस्थान, उत्तराखंड, महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ आणि हरियाणा या राज्यांमध्ये जन्मदर घटून स्त्रियांची संख्या अजूनही कमी झालेली आहे. एकीकडे 17 राज्यात मुलींचे प्रमाण घटले असताना काही राज्यांमध्ये मात्र जन्मदरात लक्षणीय वाढझालेली आहे. स्त्रीभ्रूणहत्या करण्याचे प्रमाण पुढे असेच सुरू राहिले तर अनेक कठोर समस्यांना, अराजकतेला तोंड द्यावे लागणार आहे. एक वेळ अशी येईल स्त्रीयांची द्रौपदी सारखी स्वयंवर भरावी लागेल, बहुपती विवाह, भात्रू विवाह पद्धती यामुळे निर्माण होण्याची शक्यता बळावेल, लैंगिक गुन्हाच्या संख्या मध्ये वाढ होईल, वयस्क पुरुष, मुलींचा बालविवाह अशा पद्धती पुन्हा सुरू होण्याची शक्यता यातून निर्माण होईल. तसेच वराकडून वधूलाच दक्षणा देण्याची पद्धती निर्माण होईल. महाराष्ट्रातील जळगाव मधील लेवापाटील, कोल्हापूर मधील मराठा, हरियाणातील जाट, गुजरात मधील पटेल या जातींमध्ये मुलींचे प्रमाण अत्यंत कमी झाले

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

असल्यामुळे विवाह इच्छुक मुलांना विवाहासाठी मुलगी मिळत नाही. या जातींमधील मुले आदिवासींच्या मुली विकत घेऊन त्यांच्याशी विवाह केल्याचे काही प्रकरणे नुकतीच समोर आलेली आहेत.

येत्या काळामध्ये स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी आवश्यक ती पाऊले शासनाला उचलावी लागतील. शासनाने आजपर्यंत केलेली प्रयत्न हे चांगले असले तरी स्त्रीभ्रूणहत्या थांबलेली नाही. सोनोग्राफी तंत्रामध्ये अजून बदल केला जावा. मुलगाच हवा या मानसिकतेवर साऱ्यांनीच आत्मपरीक्षण करायला हवं. सरकार व स्वयंसेवी संस्थांनी एकत्रित येऊन रणनीती ठरवण्याची आवश्यकता येत्या काळात गरजेची आहे. सोनोग्राफी सेंटरवर 'सायलेंट ऑब्झर्वर'च्या माध्यमातून देखरेख ठेवण्यात जरी येत असली तरी त्याची योग्य अंमलबजावणी होताना दिसत नाही. म्हणून शासकीय स्तरावर अशा प्रकारच्या घटना होऊ नये यासाठी प्रत्यक्ष देखरेख ठेवावी. दोषी असणाऱ्या डॉक्टरांवर कडक कारवाई होण्याऐवजी ते मोकाट फिरताना दिसतात. अशा डॉक्टरांवर मोका लावून किंवा देशद्रोहा सारखा गुन्हा नोंदवून त्याच्यावर कारवाई करण्यात यावी. तेव्हाच आगामी काळात मोठ्या अराजकतेपासून देशाची सुटका होणार आहे. म्हणून योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

➢ संदर्भ ग्रंथः–

1. लोकसंख्या अहवाल–1961 ते 2011
2. शाह, हेमराज, स्त्री भ्रूणहत्या कारणे आणि उपाय,
3. सोनावणे, व्ही. वाय. व उपाडे, जी.एम., स्त्रीभ्रूणहत्या एक सामाजिक समस्या, जळगावः प्रशांत पब्लिकेशन.
4. कांबळे, संजयकुमार.(2011). चला ओळख करून घेऊया लिंगगुणोत्तराची, पुणेः
5. नवदेवे, बंडू.(2018). स्त्रीसक्षमीकरणः दशा आणि दिशा, नागपूरःसाई ज्योती पब्लिकेशन.
6. लोकराज्य मासिक, सप्टेबर,2011.
7. लोकसत्ता, चतुरंग, 10 डिसेंबर, 2011.
8. लोकसत्ता, 13 जुलै, 2011.
9. लोकसत्ता, 12 जुलै, 2011.

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR